# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ. १०९७/प्र.क्र. ११६/९७ पं.रा.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २ जुलै १९९७.

प्रति,

जिल्हाधिकारी,
उस्मानाबाद.

**विषय :** ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूका-१९९७
प्रभाग रचना प्रस्ताव तयार करण्याबाबत......

**संदर्भ :** १. आपलेकडील अर्धशासकीय पत्र क्रमांक ९७/जीबी/डेस्क-१/ग्रापनि/कावि, दिनांक २६ एप्रिल १९९७.
२. आपलेकडील पत्र क्रमांक ९६/जीबी/डेस्क-१/ग्रापनि/सीआर-७५, दिनांक ७ जून १९९७.

महोदय,

आपल्या कार्यालयातील निवासी उप जिल्हाधिकारी हे आयोगाच्या कार्यालयामध्ये दिनांक २५/२६ जून १९९७ रोजी उपस्थित राहिले. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याला त्यासमोर नमूद केल्याप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| मुद्दा.—ग्रामपंचायतीतील प्रभाग रचना ही लगतच्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या आधारे करीत असताना जनगणना कार्यालयातून उपलब्ध झालेल्या अभिलेखानुसार त्या वेळेच्या घरयाद्या व कुटुंब प्रमुखाचे नाव प्राप्त होते. तथापि, तेथील घरातील लोकसंख्या उपलब्ध होत नाही. अशावेळी ग्रामपंचायतींची प्रभाग रचना कशा प्रकारे करावी ? | राज्य निवडणूक आयोगाने त्याच्या क्रमांक रानिआ-१०९६/प्र. क्र. ८/९६/पंरा, दिनांक १२ फेब्रुवारी १९९६ च्या पत्रातील परिच्छेद क्र. २ मधील मुद्दा क्र. १ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार ग्रामपंचायतीची प्रभाग रचना करावयाची आहे. प्रभाग रचना करीत असताना त्या प्रभागासाठी निश्चित झालेल्या लोकसंख्येमध्ये १० अधिक व १० टक्के वजा या मर्यादेमध्ये प्रभाग रचना करावयाची आहे. ही करीत असताना जनगणनेचा गट शक्यतो न तोडता प्रभाग रचना करण्यात यावी. तथापि, एखाद्या ठिकाणी जनगणनेचा गट तोडणे आवश्यक असेल तेथे जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेनुसार प्रभाग रचना करावी. |

२. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या उपरोक्त संदर्भ क्रमांक २ येथील पत्रासोबत पाठविण्यात आलेला ढोकी ग्रामपंचायतीचा प्रस्ताव परत करण्यात येत आहेत.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

(रा. ना. जोशी)
उप आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग.

प्रत : सर्व जिल्हाधिकारी यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.